**संचालक फलोत्पादन**
(कृषि आयुक्तालय)
कृषि भवन जवळ, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५
**दुरध्वनी क्र.** ०२०-२५५३८०९५/२५५३७९५७ **ई-मेल-** hortplantprotection@rediffmail.com
**फॅक्स नं. ०२०-२५५३७५६५**

**तात्काळ**

जा.क्र.कृआ/फलो-३/रा.पू.पी.सं.यो./मा.सू./२०१७-१८/ ५५०३ /१७
कृषि आयुक्तालय (फलोत्पादन विभाग), महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११ ००५. दिनांक :-१७/१०/२०१७
२६/१०/२०१७

प्रति,

**विभागीय कृषि सहसंचालक,**
ठाणे / नाशिक / पुणे / कोल्हापूर /
औरंगाबाद / लातूर / अमरावती / नागपूर

**विषयः- राज्य पुरस्कत फलोत्पादन पीक संरक्षण योजना (फलोत्पादन पिके) सन २०१७-१८ मध्ये राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना...**

**संदर्भ-** १. शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे, दिनांक-१९/०४/२०१७
२. संचालक, (नि.व गु.नि.) यांच्या मार्गदर्शक सूचना क्र. सीपीएस/निविष्ठा/डीबीटी/मा.सू. १७-१८/१६७/गुनि-५, दिनांक-२०/०६/२०१७
३. शासन निर्णय क्रमांक- पिसंयो २०१७/प्र.क्र. १०७/९-अे, दिनांक-१२/०७/२०१७
४. शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३१/१७-अे/भाग-१ दिनांक-१२/०९/२०१७

सन २०१७-१८ मध्ये राज्य पुरस्कृत पीक संरक्षण योजनेंतर्गत फळपिके, भाजीपाला, फुलपिके, मसालापिके, औषधी व सुगंधी वनस्पती या पिकांवरील कीड रोग नियंत्रणासाठी औषध वाटप / फवारणी कार्यक्रम ५० टक्के अनुदानावर राबविण्यासाठी संदर्भ क्र. ३ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर वाटप करावयाच्या कृषि निविष्ठांसंदर्भात थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पध्दतीने लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रोख स्वरुपात लाभ देण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने घेतला असून त्यानुषंगाने संदर्भ क्र. १ अन्वये कीटकनाशक व इतर निविष्ठांच्या अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रोख स्वरुपात जमा करण्याची कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन संचालक, (नि. व गु. नि.) यांनी संदर्भ क्र. २ अन्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

तथापि संदर्भ क्र.४अन्वये बियाणे,सुक्ष्म मुलद्रव्ये,जैविक खते,जैविक किटकनाशके तसेच महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ मर्या.मुंबई यांची उपकंपनी एम.आय.एल.यांनी स्वतःउत्पादीत केलेली रासायनिक किंवा जैविक किटकनाशके अशा पाच निविष्ठांच्या स्वंयनिर्मित उत्पादनाचा पुरवठा महाबीज,शासकीय संस्था,कृषि विदयापीठे,कृषि विदयान केंद्र,महाराष्ट्र इन्सेक्टीसाईडस लि.अकोला( एम.आय.एल.)यांच्या कडून केला गेल्यास थेट लाभ हस्तांतरण योजनेच्या(डीबीटी)माध्यमातुन अनुदान देण्याचा प्रश्न उदभवत नाही.परंतु वरील प्रमाणे एम.आय.एल.यांनी स्वतःची उत्पादीत केलेली किटकनाशके वगळुन इतर किटकनाशके या निविष्ठांचा पीक संरक्षण योजनेंतर्गत पुरवठा करावयाच्या औषधांसाठी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पध्दतीचा अवलंब करणे क्रमप्राप्त ठरते. ही बाब विचारात घेऊन सन २०१७-१८ मध्ये पीक संरक्षण योजना राबविण्यासाठी मार्गदर्शक

सूचना सहपत्रित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णय व मार्गदर्शक सूचनांमध्ये नमुद कार्यपद्धतीचा अवलंब करुन योजना अंमलबजावणीबाबत कार्यवाही करण्यात यावी. तसेच योजना अंमलबजावणीबाबत अडचणी असल्यास या कार्यालयास अवगत करावे. भविष्यात काही बदल झाल्यास आपणास अवगत करण्यात येईल.

**सोबत-** वरीलप्रमाणे

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११ ००५

**प्रत:-**

१. **प्रधान सचिव, (कृषि व फलोत्पादन)**, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२ यांना माहितीस्तव.
२. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,** (सर्व) यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
३. **कृषि विकास अधिकारी,** (सर्व) यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

# राज्य पुरस्कृत फलोत्पादन पीक संरक्षण योजना सन २०१७-१८

# मार्गदर्शक सूचना

---------------------------------------ooooo---------------------------------------

**१. प्रस्तावना :-**

सन २०१७-१८ मध्ये फळपिके, भाजीपाला, फुलपिके, मसाला पिके औषधी व सुगंधी वनस्पती या पिकावरील सर्व कीड / रोग नियंत्रणासाठी औषधाचे वाटप / फवारणी साठी ५० टक्के अनुदानावर राबविण्यास शासन निर्णय क्रमांक- पिसंयो २०१७/प्र.क्र. १०७/९-अे, दिनांक-१२/०७/२०१७ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

**२. योजनेची उद्दिष्ट्ये :-**

संत्रा काळी / पांढरी माशी (कोळशी) व फायटोप्थोरा रोग, आंबा तुडतुडे व भुरी रोग, चिक्कू बी पोखरणारी अळी, नारळ ईरिओफाईड माईटस्, सुपारी कोळेरोग, काजू टी-मॉस्कुटो, केळी करपा रोग, बटाटा करपा रोग, मिरची चुरडा-मुरडा, कांदाफुलकीडे व करपा या प्रमुख कीड व रोगाचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. या कीड/रोग नियंत्रणासाठी लागणारी कीटकनाशके / बुरशीनाशके किंमतीच्या ५० टक्के अनुदान पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करायचे आहे. जिल्हानिहाय भौतिक व आर्थिक लक्ष बाबतची माहिती सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

वरील फलोत्पादन पिकाव्यतिरिक्त इतर फळपिके, भाजीपाला, फुलपिके, मसाला पिके, औषधी व सुगंधी वनस्पती या पिकामध्ये अचानक कीड रोगाचा प्रादुर्भाव जिल्ह्यात आढळून आल्यास त्यावरही जिल्ह्यास उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाच्या अधिन राहुन पिक संरक्षण कार्यक्रम राबविण्यास मंजुरी देण्यात येत आहे. सदर पिकावर कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार औषधाची फवारणी करण्यात यावी व त्यानुषंगाने प्रति हेक्टरी ५० टक्के अनुदानाची मर्यादा ठरविण्यात यावी. सदर कार्यवाही करण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / विभागीय कृषि सहसंचालक यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. उपरोक्त प्रमाणे केलेल्या पिकनिहाय बदलाची माहिती त्याचप्रमाणे भौतिक लक्ष्याची माहिती वेळोवेळी कृषि आयुक्तालयास कळविण्यात यावी.

**३. लाभार्थी निवड-**

सदर योजनेंतर्गत सर्वसाधारण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इत्यादी प्रकारचे शेतकरी पात्र राहतील. तथापि अल्प भुधारक / सिमांतिक शेतकरी व अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

**४. लाभार्थ्याची ओळख :-**

जैविक / रासायनिक किटकनाशके या कृषि निविष्ठांचा अनुदानावर पुरवठा करण्याकरीता सदर योजनेंतर्गत लाभार्थी निवडीचे निकष खालीलप्रमाणे राहील.

१. शेतकऱ्यांच्या स्वतःच्या नावे असलेल्या शेतीच्या क्षेत्राचे ७/१२ व ८ अ चे दाखले.
२. लाभार्थी अनुसूचित जाती / जमाती या प्रवर्गातील असल्यास त्याबाबत प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दिलेल्या वैध जात प्रमाणपत्राची प्रत.
३. आधार ओळखपत्राची प्रत.
४. अर्जदार शेतकऱ्याने त्याचे बँकेचे खाते आधार क्रमांकाशी जोडून घेणे आवश्यक आहे आणि त्याकरीता त्याने बँकेला दिलेल्या पत्राची व बँकेकडून मिळालेल्या पोहोच पावतीची प्रत.

**५. अनुदान प्रमाण-**

किडरोग नियंत्रणासाठी किटकनाशके / बुरशीनाशके यांची खरेदी संचालक फलोत्पादन यांनी मंजूर केलेल्या यादीप्रमाणे शेतकऱ्यांनी करावी. किटकनाशके / बुरशीनाशके यांची शिफारस बँड नावाने न करता, जेनेरिक नावाने करावी, जेणेकरुन खाजगी कंपनीच्या व्यवसायास मदत करण्याची भूमिका राहणार नाही. रासायनिक व जैविक किटकनाशके / बुरशीनाशके यांची खरेदी करण्याची मुभा शेतकऱ्यांना राहील.

सदर योजनेंतर्गत पुरवठा करावयाच्या किटकनाशकाची उत्पादनावर छापण्यात आलेली कमाल विक्री किंमत व प्रत्यक्ष विक्री किंमत यापैकी जी कमी असेल ती ५० टक्के अनुदानासाठी ग्राह्य धरण्यात यावी. प्रत्यक्ष खरेदीची पावती कृषि विभागाकडे सादर केल्यानंतर अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल.

**६. किटनाशकाचा दर्जा, गुणवत्ता व तांत्रिक निकष :-**

१) लाभधारकाने जैविक व रासायनिक किटकनाशके खरेदी अधिकृत विक्रेत्यांकडून करताना विक्रेत्याने देयक / बिलावर सदर निविष्ठेचे जेनेरिक / तांत्रिक नाव नमुद करणे बंधनकारक राहील. देयकाची अदायगी करताना संबंधीतांनी याबाबत खात्री करावी. सदर निविष्ठांच्या तांत्रिक नावाची माहिती cibrc.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच फलोत्पादन प्रमुख फळपिकावरील कीड रोग नियंत्रणाकरीता केंद्रिय कीटकनाशक मंडळ व नोंदणी समिती, फरिदाबाद यांनी मंजूर केलेल्या लेबल क्लेम किटकनाशकांची यादी **प्रपत्र अ** मध्ये दिलेली आहे.

२) कृषि निविष्ठांची खरेदी अधिकृत विक्रेत्यांकडून करताना संबंधीत विक्रेत्याने बिलाच्या मागे खाली नमुद केल्याप्रमाणे प्रमाणपत्र द्यावे.

**"बिलात नमुद केलेल्या जैविक / रासायनिक किटकनाशकाचे स्वतःचा समावेश माझ्या विक्री प्रमाणपत्रात आहे"**

**स्वाक्षरी व शिक्का**

३) एखाद्या अपवादात्मक परिस्थितीत स्थानिक परिस्थितीनुरुप किड / रोगाच्या अनुषंगाने जिल्हा मासिक चर्चा सत्रात कृषि विद्यीठ तज्ञांनी दिलेल्या सल्ल्यानुसार त्यांच्या लेखी शिफारशी घेऊन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांना सदर शिफारशीचा अवलंब करता येईल. मात्र त्याबाबतचे अभिलेख जतन करणे बंधनकारक आहे. कोणत्याही परिस्थितीत शिफारस केलेल्या मात्रेनुसार शिफारस केलेल्या पिकासाठी व शिफारस केलेल्या कीड रोगासाठीच जैविक औषधाचा वापर होईल याची दक्षता घ्यावी.

४) कृषि विकास अधिकारी यांनी जिल्हा स्तरावर त्या त्या जिल्ह्यात पिक रचना व पिक परिस्थितीनुसार वापरण्यात येणाऱ्या किटकनाशकांची यादी कृषि विद्यापीठांचे सल्ल्यानुसार तयार करावी. सदर यादीमध्ये पुढील बाबी नमुद करण्यात याव्यात.

(१) पिकाचे नाव
(२) किड रोगाचे नाव
(३) वापरावयाचे किटकनाशक
(४) किटकनाशक वापरण्याचे प्रमाण

उपरोक्त माहितीव्यतिरिक्त आवश्यकतेनुरुप इतर माहिती नमुद करण्यात यावी. सदर यादी सर्व क्षेत्रिय कर्मचाऱ्यांपर्यंत जिल्हा स्तरावरुन पुरविण्यात यावी.

**७. थेट लाभ हस्तांतरण पध्दतीने (डीबीटी) लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रोख रक्कमेचे हस्तांतरण:-**

१) लाभार्थी ज्या डिलर / विक्रेत्यांकडून कृषि निविष्ठा घेणार आहे, तो वैध डिलर परवानाधारक / विक्री परवानाधारक व दुकाने व आस्थापना अधिनियमाखालील वैध परवानाधारक असावा.

२) थेट लाभ हस्तांतरण करण्याकरीता, शासनाने विहित केलेल्या गुणवत्ता, दर्जा व तांत्रिक निकषापेक्षा विनिदेशनापेक्षा कमी नसलेल्या गुणवत्तेच्या, दर्जाच्या व तांत्रिक निकषांच्या, योजनेंतर्गत मंजूर वरील कृषि

निविष्ठा, म्हणजेच जैविक / रासायनिक किटकनाशके उत्पादक कंपनीच्या कोणत्याही अधिकृत विक्रेत्याकडून विकत घेण्याची मुभा लाभधारकास राहिल.

३) लाभार्थी शेतकऱ्यांनी कृषि निविष्ठांची खरेदी अधिकृत विक्रेत्याकडून कॅशलेस पध्दतीने करावी. त्याकरीता त्याने त्याचा आधार क्रमांकाशी निगडीत स्वतःच्या बँक खात्यामधुन विक्रेत्याला देय किंमतीचे प्रदान करावे. म्हणजेच एनईएफटी, आरटीजीएस, आयएमपीएस इत्यादी इलेक्ट्रोनिक फंड ट्रान्सफर किंवा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट), धनादेश (चेक) द्वारे किंमतीचे प्रदान होणे आवश्यक आहे व त्याचा पुरावा अनुदान मागणीचा दावा करताना सादर करणे आवश्यक राहील.

४) लाभार्थी शेतकऱ्यांनी किटकनाशकांची खरेदी केल्यानंतर देयकाची प्रत विक्रेत्याकडून दोन प्रतित घ्यावी. त्यापैकी एका देयकाची स्वयं साक्षांकीत प्रत कृषि विभागाच्या संबंधीत अधिकाऱ्याकडे / कार्यालयाकडे सादर करावी. त्यांची ओळख संगणकावर बायोमॅट्रिक पद्धतीने नोंदविण्यात येईल. वरील ३ मध्ये नमुद केलेल्या पुराव्याव्यतिरिक्त देयकासह अन्य कोणतेही कागदपत्र सादर करण्याची सूचना लाभधारकास दिली गेली असल्यास त्याची प्रत सादर करणे आवश्यक राहील.

५) शासन सूचनेनुसार काही देयकांची संबंधीत विभागाकडून पडताळणी / तपासणी करुन घेण्यात येईल. जेणेकरुन खोट्या देयकाच्या आधारे अनुदानाची रक्कम मिळवण्यावर नियंत्रण राखणे शक्य होईल.

६) वरीलप्रमाणे कार्यवाही झाल्यावर अनुदानाची संपूर्ण रक्कम लाभार्थ्याच्या बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) द्वारे १५ दिवसांच्या आत जमा करणे, सेवा हमी कायद्यान्वये बंधनकारक राहील.

७) लाभार्थी स्वतः विक्रेत्याकडून किटकनाशकाची खरेदी करणार असल्याने किटकनाशकाच्या गुणवत्तेसंदर्भात कृषि विभागाची कोणतीही जबाबदारी असणार नाही.

८) सन २०१७-१८ पासून किटकनाशकाची खरेदी करणे आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांना सोईस्कर व्हावे, याकरीता कृषि विकास अधिकारी यांनी जिल्ह्याच्या पत आराखड्यामध्ये योग्य उद्दिष्ट व आर्थिक तरतुदीचा समावेश करावा.

९) तथापि बियाणे,सुक्ष्म मुलद्रव्ये,जैविक खते,जैविक किटकनाशके तसेच महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ मर्या.मुंबई यांची उपकंपनी एम.आय.एल.यांनी स्वतःउत्पादीत केलेली रासायनिक किंवा जैविक किटकनाशके अशा पाच निविष्ठांच्या स्वंयनिर्मित उत्पादनाचा पुरवठा महाबीज,शासकीय संस्था,कृषि विदयापीठे,कृषि विदयान केंद्र,महाराष्ट्र इन्सेक्टीसाईडस लि.अकोला( एम.आय.एल.)यांच्या कडून केला गेल्यास थेट लाभ हस्तांतरण योजनेच्या(डीबीटी)माध्यमातुन अनुदान देण्याचा प्रश्न उदभवत नाही.परंतु वरील प्रमाणे एम.आय.एल.यांनी स्वतःची उत्पादीत केलेली किटकनाशके वगळुन इतर किटकनाशके या निविष्ठांचा पीक संरक्षण योजनेंतर्गत पुरवठा करावयाच्या औषधांसाठी थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पध्दतीचा अवलंब करणे क्रमप्राप्त ठरते.

राज्य पुरस्कृत फलोत्पादन पीक संरक्षण योजनेंतर्गत अनुदानावर वाटप करावयाच्या किटकनाशकासंदर्भात थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) योजना राबविण्याबाबत काही अडचणी असल्यास या कार्यालयाशी संपर्क साधावा.

सदर योजनेंतर्गत सन २०१७-१८ मध्ये थेट लाभ हस्तांतरणाद्वारे वापर करण्यात आलेल्या किटकनाशकांचा तपशिल सोबत जोडलेल्या **प्रपत्र क** मध्ये दरमहा कृषि आयुक्तालयास ई-मेलद्वारे सादर करण्यात यावा.

## ८. लेखाशिर्ष-

राज्य पुरस्कृत पीक संरक्षण योजनेंतर्गत फळपिके, भाजीपाला, फुलपिके, मसाला पिके औषधी व सुगंधी वनस्पती या पिकावरील सर्व कीड / रोग नियंत्रणासाठी देय अनुदानाचा खर्च खालील लेखाशिर्षामधुन करावा.

मागणी क्रमांक डी ३
२४०१- पीक संवर्धन
११९- बागायती व भाजीपाला पिके
(०१) (२०) पीक संरक्षण योजना
(२४०१ ३२१५) ३३ अर्थसहाय्य

९. **अनुदान वितरण-**

सन २०१७-१८ मध्ये मंजूर केलेल्या तरतुदीतून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा निधी बीडीएसद्वारे उपलब्ध होणार आहे. त्याबाबत कृषि विकास अधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

१०. **आहरण व सवितरण अधिकारी घोषित करणेबाबत-**

पीक संरक्षण योजनेसाठी संबंधीत जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी हे आहरण व सवितरण अधिकारी राहतील.

-------------------------------------ooooo-------------------------------------

## प्रपत्र-ब

## राज्य पुरस्कृत पीक संरक्षण योजना सन २०१७-१८ जिल्हानिहाय मंजूर नियतव्यय

| अ.क्र. | जिल्हा | अनुदान (रु. लाखात) |
|---|---|---|
| १ | पालघर | १.४९ |
| २ | ठाणे | ०.९४ |
| ३ | रायगड | ४.०५ |
| ४ | रत्नागिरी | ७.३६ |
| ५ | सिंधुदुर्ग | १२.१२ |
| | **एकुण ठाणे विभाग** | **२५.९६** |
| ६ | नाशिक | ३.६८ |
| ७ | धुळे | ०.३९ |
| ८ | नंदुरबार | ०.३९ |
| ९ | जळगाव | ३.६८ |
| | **एकुण नाशिक विभाग** | **८.१४** |
| १० | अहमदनगर | २.०३ |
| ११ | पुणे | १.८५ |
| १२ | सोलापूर | ८.०९ |
| | **एकुण पुणे विभाग** | **११.९७** |
| १३ | सातारा | १.६३ |
| १४ | सांगली | १.८५ |
| १५ | कोल्हापूर | ०.८३ |
| | **एकुण कोल्हापूर विभाग** | **४.३१** |
| १६ | औरंगाबाद | ०.७५ |
| १७ | जालना | ०.७५ |
| १८ | बीड | ०.९१ |
| | **एकुण औरंगाबाद विभाग** | **२.४१** |
| १९ | लातूर | ०.७५ |
| २० | उस्मानाबाद | ०.२० |
| २१ | परभणी | ०.७५ |
| २२ | हिंगोली | ०.७५ |
| २३ | नांदेड | ०.०० |
| | **एकुण लातूर विभाग** | **२.४५** |
| २४ | बुलढाणा | ०.८३ |
| २५ | अकोला | ०.६३ |
| २६ | वाशिम | ०.८३ |
| २७ | अमरावती | १८.३६ |
| २८ | यवतमाळ | ६.०६ |
| | **एकुण अमरावती विभाग** | **२६.७१** |
| २९ | नागपूर | १२.८६ |
| ३० | वर्धा | २.०३ |
| ३१ | भंडारा | ०.७५ |
| ३२ | गोंदिया | ०.७५ |
| ३३ | चंद्रपूर | ०.८३ |
| ३४ | गडचिरोली | ०.८३ |
| | **एकुण नागपूर विभाग** | **१८.०५** |
| | **एकुण विभाग** | **१००.००** |

पपत्र क

## राज्य पुरस्कृत फलोत्पादन पीक संरक्षण योजना सन २०१७-१८ अंतर्गत थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) द्वारे वापरण्यात आलेल्या किटकनाशकांचा तपशिल

विभाग जिल्हा माहे- अखेर

| अ.क्र. | फळपिकाचे नाव | किटकनाशकाचे नाव | किंमत | परिमाण (लिटर / कि.ग्रॅम) | लाभार्थी संख्या | डीबीटीद्वारे वर्ग करावयाचे अनुदान | डीबीटीद्वारे वर्ग केलेले अनुदान | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

# प्रपत्र अ

| अ. क्र | पिकाचे नाव | कीड / रोग | औषधांचे नाव | औषधाचे परिमाण | लेबल क्लेम (आहे/नाही) |
|---|---|---|---|---|---|
| १. | संत्रा | काळी/पांढरी माशी | डायमिथोएट ३० टक्के ई सी | १४८५-१९८०मिली प्रति१५००-२००० ली.पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | नाही |
| २. | संत्रा | फायटोप्थोरा | ऑरोफन्झीन ४६.१५ टक्के एस सी | १ टक्के प्रति ली. पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| ३. | आंबा | तुडतुडे | डायमिथोएट ३० टक्के ई सी | २४७५-३३००मिली प्रति१५००-२००० ली.पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | | इमिडयाक्लोप्रीड १७.८ टक्के एल | २-४ मिली प्रति १० ली.पाणी प्रति झाड | |
| ४. | आंबा | भुरी | कार्बेनडाझीम ४६.२७ टक्के एस सी | १०० मिली प्रति १०० ली पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | | डीनोकॅप ४८ ट्क्के ई सी | ५ ग्रॅम/१० लि पाणी प्रति हेक्टर | आहे |
| | | | हेक्झाकोनेझॉल ५ ट्क्के ई सी | १०० मिली प्रति १०० ली पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | | हेक्झाकोनेझॉल ५ ट्क्के एस सी | २०० मिली प्रति १०० ली पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | | पेनकोनेझॉल १० ट्क्के ईसी | ५० मिली प्रति १०० ली पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | | सल्फर ४० ट्क्के ड्ब्लु पी | ३.७५-५.०० कि.ग्र. किलो/१०००ली पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | | सलफर ५५.१६ ट्क्के एस सी | ३०० मिली प्रति १०० ली पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | | सलफर ८० ट्क्के ड्ब्लु पी | ३.१३ कि. ग्र. प्रति ७५०-१००० ली पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | | सलफर ८० ट्क्के ड्ब्लु जी | १.८७५-२.५० कि. ग्र. प्रति ७५०-१००० ली पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | | अॅझोक्झीस्ट्रोबीन २३ ट्क्के एस सी | १०० मिलि/१००लि पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| ५. | काजू | टीमॉस्कुटो | | | नाही |
| ६. | नारळ | इरिडोफाईड माईट्स | फेन्पॉयरोक्झीमेट ५ टक्के ईसी ०.५ ग्रम/झाड | १० मिली/लि पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| ७. | चिकू | बी-पोखरनारी अळी | प्रोफेनोफोस ५० ई.सी. | १५ मि.ली. प्रती १० लिटर पाण्येंतून पहिली फवारणी ऑक्टोबर मध्ये. त्यापुढील दोन फवारण्या एक महिन्याच्या अंतराने किटकनाशक्े आलटून पालटून कराव्यात. | नाही |
| | | बी-पोखरनारी अळी | इंडोक्झाकार्ब १४.५ एस. सी. | ५ मि.ली. प्रती १० लिटर पाण्यातून पहिली फवारणी ऑक्टोबर मध्ये. त्यापुढील दोन फवारण्या एक महिन्याच्या अंतराने किटकनाशक्े आलटून पालटून कराव्यात. | नाही |
| | | बी-पोखरनारी अळी | नोव्याल्युरॉन १० ई.सी. | ५ मि.ली. प्रती १० लिटर पाण्येंतून पहिली फवारणी ऑक्टोबर मध्ये. त्यापुढील दोन फवारण्या एक महिन्याच्या अंतराने किटकनाशक्े आलटून पालटून कराव्यात. | नाही |
| | | बी-पोखरनारी अळी | डेल्तामेथ्रीन २.८ ई.सी. | १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्येंतून पहिली फवारणी ऑक्टोबर मध्ये. त्यापुढील दोन फवारण्या एक महिन्याच्या | नाही |

| अ. क्र | पिकाचे नाव | कीड / रोग | औषधांचे नाव | औषधाचे परिमाण | लेबल क्लेम (आहे/नाही) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | अंतराने किटकनाशक्ले आलटून पालटून कराव्यात. | |
| ८. | **चिकू** | फळगळ | | | नाही |
| ९. | केळी | करपा | कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० टक्के डब्ल्यु पी | २.५ मिली प्रति ७५०-१००० लि पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | करपा | मेनेकोझेब ७५ टक्के डब्ल्यु पी | १.५-२ किलो प्रति १००० लि प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| १०. | **सुपारी** | **कोळे रोग** | | | नाही |
| ११. | **मिरची** | **चुरडा मुरडा** | | | नाही |
| १२. | बटाटा | करपा | कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० डब्ल्यु पी | २.५ मिली प्रति ७५०-१००० लि पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | करपा | एमीटोक्ट्रेडीन + डायमथोमॉर्फ २०.२७ एस सी | ८००-१००० मिली/७५० लि पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| १३. | कांदा | करपा | मॅन्कोझेब ७५ डब्लु पी | १.५-२ किलो /७५० ली | आहे |
| | | करपा | झायनेब ७५ डब्लु पी | १.५-२ किलो /७५०-१००० ली. | आहे |
| | | फुलकिडे | डायमिथोएट ३० टक्के ईसी | ६६० मिली/५००-१००० लि पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | फुलकिडे | लॅम्डा-सायलोथ्रीन ५ टक्के ईसी | ३०० मिली/३००-४०० लि पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | फुलकिडे | ऑक्सिडिमेटॉन मिथील २५ टक्के ईसी | १२०० मिली/५००-१००० लि पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |
| | | फुलकिडे | फिप्रोनील ८० टक्के डब्लु जी | ७५ मिली/५० लि पाणी प्रति हेक्टर फवारणीसाठी | आहे |